**प्रेस नोट दिनांक २२/०६/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**प्रेमीयुगलांचे समुपदेशन केलेबाबत.**

------------ooo----------

दि. २२.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यावर पोलीस उप निरीक्षक हंचाटे असताना, तक्रारदार महिला,रा.हरकानगर भवानी पेठ पुणे यांनी समक्ष कळविले की, त्यांची नात सज्ञान मुलगी,वय २१ वर्षे व सज्ञान मुलगा,वय २४ वर्षे या दोघांचे प्रेमसंबंध असुन ते दोघे प्रेमविवाह करणार असल्याचे सांगुन त्यास आमचे दोन्ही कुटुंबाचा विरोध असल्याचे सांगुन तक्रारदार देण्याकरीता मुलीची आजी आली असल्याचे सांगितले.

सदरवेळी ठाणे अंमलदार पोउपनि हंचाटे, पोना इम्रान नदाफ व पोशि महावीर दावणे यांनी मुलगी,वय २१ वर्षे व मुलगा,वय २४ वर्षे या दोघांना व त्यांचे सर्व कुटूबियांना समक्ष बोलावुन घेवून त्यांचे वयाबाबत योग्य ती खातरजमा करून त्यांना कायदेशीर सल्ला देवून त्यांची समजुत काढून त्यांना योग्य प्रकारे समुपदेशन केले असता, समक्ष हजर असलेल्या दोन्ही कुटूंबियांनी ऐकमेकांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची तक्रार नसून दोन्ही प्रेमीयुगलांचे त्यांचे धर्माचे रितीरीवाजानुसार लग्न लावुन देणार असल्याचे समक्ष कळवुन पोलीसांचे आभार मानले.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.